# <u>प्रेसनोट</u>

जा.क्र.पोउप-आ/वाहतूक/४०४४/२०१८ पुणे शहर, दिनांक – ०७.०८.२०१८

**विषय :- रेसिंग बाईक, बुलेट यांचेवर अनधिकृतपणे लावलेले सायलेंसर तसेच वाहतुकीचे नियमभंग केले बाबत विशेष मोहीमेद्वारे करण्यात आलेल्या कारवाई बाबत.**

--------००--------

पुणे शहर परिसरातील अपघातांचे प्रमाण कमी करण्याकरीता व वाहतूक सुरळीत व सुरक्षित चालणेकरीता वाहतूक शाखेकडून वारवांर वेगवेगळया कलमाखाली विशेष मोहिमांचे आयोजन केले जाते.

अपघात टाळणेसाठी व वाहतूकीस शिस्त लागणेसाठी नुतन पोलीस आयुक्त,श्री. व्यंकटेशम् यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे पुणे शहर वाहतूक शाखेतर्फे दिनांक- ०६.०८.२०१८ रोजी विशेष मोहिम राबविण्यात आली होती, त्यामध्ये **रेसिंग बाईक्स** भरधाव वेगाने चालविले बाबत मोटार वाहन कायदा कलम १८४ नुसार एकुण **३६** वाहनचालकांवर कारवाई करण्यात आलेली आहे व २३१००/- रु. दंड रक्कम वसुल केली आहे.सदर बाईक्स ह्या अल्पवयीन बालके चालवित असताना मिळून आल्यास त्यांचे पालकांना बोलावून घेऊन त्यांचेवर कारवाई करण्यात येणार आहे. तसेच **<u>बुलेट</u>** मोटार सायकलला बेकायदेशीररित्या वेगवेगळ्या आवाजाचे सायलेन्सर लावणा-या वाहनचालकांवर मोटार वाहन कायदा कलम १९८ नुसार एकुण **२००** वाहनचालकांवर कारवाई करण्यात आलेली आहे. व १,२०,४००/- रु. दंड रक्कम वसुल केली आहे.

तसेच **ट्रिपलसिट** वाहन चालविणारे २६५ वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली असून ४२०००/- दंड रक्कम वसुल केली आहे व वाहतुकीस अडथळा होईल अशा ठिकाणी वाहने पार्क करणारे ४१८ वाहनांना **जॅमर** लावुन करावाई करण्यात आली असून ६९४००/- दंड रक्कम वसुल केली आहे.

सदर विशेष मोहीमेमध्ये एकुण **९१९** वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली असून एकुण **२,५४,९००/-** दंड रक्कम वसुल केली आहे. अशा प्रकारे सदरची विशेष मोहिम यापुढेही चालू राहणार आहे.

तरी नागरीकांना याद्वारे असे आवाहन करण्यात येते की, पुणे शहरातील वाहतूक सुरळीत व सुरक्षित ठेवणेकरीता वाहतूकीच्या नियमांचे तंतोतंत पालन करून वाहतुक पोलीसांना सहकार्य करावे.